**महाराष्ट्र शासन**

क्रमांक :टिपीबी-४३१९२५९/प्र.क्र.१५०/२०१९/नवि-११
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक : १३ /०९/२०१९.

प्रति,
आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका.

विषय :- Redevelopment of Municipal properties reserved for buildable reservation under the provisions of Regulation 33(7) of DCPR 2034.

संदर्भ :- आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. MGC/A/७९६२, दि. ४/०६/२०१९.

महोदय,

संदर्भित पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३३(७) मध्ये मुंबई शहरातील उपकर प्राप्त मिळकतींचा पुनर्विकास तसेच महापालिकेच्या मालकीच्या जुन्या इमारतींचे पुनर्विकास संबंधीत तरतूद आहे. सदर विनियम ३३(७) अन्वये पुनर्विकास करताना त्यामधील आरक्षित क्षेत्राचा विकास करण्यासंबंधी तरतूद विनियम १७(३)(B) मध्ये आहे. सदर विनियम १७(३) (B) च्या तरतुदी हया विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या ई.पी.३५ मध्ये समाविष्ट होत्या. शासनाने दि. २१/०९/२०१८ रोजी ई.पी. ला मंजूरी देताना ई.पी. ३५ चे अनुषंगाने विनियम १७(३)(B) ला मंजूरी दिली आहे.

आपणाकडील संदर्भित पत्राचे अनुषंगाने आपणास पुढीलप्रमाणे कळविण्याबाबत मला आदेश आहेत.

(i) विनियम १७(३)(B) च्या ई.पी.-३५ ला मंजूरी देताना ईपी-३५ शासनाने प्रस्तावित केल्यानुसार काही सुधारणांसह मंजूर केला आहे. सदर सुधारणा फक्त १७(३)(B)(४) चे (i) व (ii) मध्ये असल्याने तेवढीच सुधारणा दर्शविण्यात आली व उर्वरित खंड (iii) ते (vi) शासनाने प्रसिध्द केल्यानुसार मंजूर केलेला आहे. म्हणजेच विनियम १७(३) (B)(४) मध्ये उपखंड (iii) ते (vi) हे मंजूरीमध्ये समाविष्ट आहेत.

(ii) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भाडेकरु व्याप्त मिळकतींचे पुनर्विकास सुरवात करण्यापूर्वी महापालिकेचे सुधार समिती मंजूरी (ICR)/ महापालिकेची मंजूरी (CR) घेण्यात आल्यानंतर महानगरपालिकेकडून इरादापत्र (LOI) देण्यात येते. त्यानंतर पुनर्विकास प्रस्तावावर नकाशे

मंजूरी मिळणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येते. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे विकास
नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये रुपांतरण करण्यासंबंधीचे विनियम ३३(१०) चे
उपखंड ११ मधील तरतूदीमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना देण्यात आलेल्या इरादापत्राच्या
दिनांकास लागू नियमावली विचारात घेण्यात आली आहे. तरी त्याच धर्तीवर
महानगरपालिकेच्या भाडेकरु व्याप्त मिळकतींचे विनियम ३३(७) अन्वये पुनर्विकास करताना
इरादापत्र दिलेल्या दिवशी लागू नियमावलीनुसार योजना विकसित करता येईल.
महानगरपालिकेचे भाडेकरु व्याप्त मिळकतींचे पुनर्विकासाठी इरादापत्र न देण्यात आलेल्या
(iii) तथापि, प्रारुप विकास योजना कलम २६ अन्वये प्रसिध्द झालेल्या दि. २७/०५/२०१६ नंतर ते
दि.१२/११/२०१८ या कालावधीत विनियम ३३(७) मध्ये पुनर्विकासासाठी महानगरपालिकेने
मंजूरी दिलेल्या (C.R.) योजनाकरीता मंजूरी (C.R.) चे दिवशी लागू मंजूर विकास नियंत्रण
नियमावलीनुसार योजना विकसित करणे, अनुज्ञेय करणेबाबत महानगरपालिकेची विनंती मान्य
करता येत नाही.

**आपला,**

( निर्मलकुमार पं. चौधरी )

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :- १) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.

३) निवडनस्ती (नवि-११)